
# ऑगस्ट-सप्टेंबर केळी लागवड समज - गैरसमज





ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात केळीची लागवड केल्यास झाडाला पडलेले घड लहान असतात आणि केळींचा आकारही मोठा होत नाही अशी तक्रार सध्या काही शेतकरी करतांना आढळून येतात. या शेतकऱ्यांचा रोख मुख्यत: केळीच्या रोपाच्या गुणवत्तेबाबत आक्षेप घेणारा असतो. वास्तविक तशी वस्तुस्थिती नाही. जैन इरिगेशन कंपनीतर्फे शेतकऱ्यांना पुरविले जाणारे केळीचे रोप अत्यंत दर्जेदार व उत्तम गुणवत्तेचेच असते. शेतकऱ्यांच्या मनात रोपाबद्दल जो गैरसमज निर्माण झालेला त्याबाबतची वस्तुस्थिती व शास्त्रीय कारणे यांचा उहापोह जैन इरिगेशनचे केळी पिक तज्ज्ञ व विपणन उपाध्यक्ष यांनी येथे केला आहे.

**श्री. के. बी. पाटील**

केळी तज्ज्ञ,  जैन इरिगेशन सिस्टीम्स लि

केळी पिकाच्या तंत्रज्ञानाच्या विकासामध्ये देशाच्या पातळीवर जैन इरिगेशनचा फार मोठा नावलौकिक आहे. कंपनीने केलेल्या पायाभूत कामगिरीमुळे आता इतर केळी उत्पादकदेश सुद्धा आपल्याकडे नवतंत्रज्ञानाच्या अपेक्षेने पाहात आहेत. गेल्या पंचवीस वर्षात केळी पिकामध्ये अनेक नाविन्यपूर्ण बदल घडले. केळीची निर्यातक्षम जात, लागवड, तंत्रज्ञान, लागवडीचा हंगाम आणि मालाच्या मागणीनुसार उत्पादन असे अनेक तत्वे निर्माण झाली. आज आपण केळीचे पीक उत्तमरित्या घेत आहोत, निर्यात सुद्धा करीत आहोत. सर्व काही सुरळीत सुरू असताना करोना म्हणजे कोविड-१९ ही महामारी चीनमध्ये डिसेंबर महिन्यात उदयास आली आणि बघता बघता संपूर्ण जगच करोनाच्या विळख्यात सापडले. या महामारीने आपल्या देशात आणि आपल्या जिल्ह्यात सुद्धा उग्र स्वरूप धारण केले आहे. त्याचा परिणाम म्हणून केळी रोपांची उत्पादन प्रक्रिया विस्कळीत झाली पर्यायाने रोपे लागवड जून जुलै ऐवजी ऑगस्ट सप्टेंबरमध्ये करावी लागत आहे. परंतु अनेक केळी उत्पादकांच्या मनात नेहमीच एक प्रश्न असतो की ऑगस्ट-सप्टेंबर मधील केळी लागवडीस गुणवत्ता मिळत नाही, उष्णतेला बळी पडते. वगैरे.. खरे तर गेल्या पंचवीस वर्षात केळी लागवडीचा हंगाम बदलला आहे. ज्यांनी हा बदल स्वीकारला तो कुठलाही हंगामात उत्तम केळी पिकवू शकतो. वीस वर्षापूर्वी गाढोदा, ता. जळगांव केळी उत्पादकांचा असा समज होता की टिशूकल्चर केळी म्हणजे फक्त मृगबागासाठी आणि कांदेबागात टिश्युकल्चरची रोपे जमत नाही. परंतु आज हे चित्र बदललेले आहे. श्री प्रवीण विश्वनाथ पाटील मु.पो. गाढोदा यांच्या कुटुंबात दोन लाख जैन टिशूकल्चर केळी रोपांची लागवड ऑक्टोबर महिन्यात केली. रास आणि एकूण उत्पादन अक्षरशः दुप्पट झाले.



असाच काहीसा समज ऑगस्ट-सप्टेंबर च्या लागवडीचा आहे. परंतु गेल्या पंधरा वर्षाचा लेखाजोखा पाहिला तर २०१५ साल वगळता कधीही या कालावधीतील केळीचे दर पडलेले नाहीत. साधारणपणे मे, जून, जुलै महिन्यात जळगाव, नंदुरबार, शिरपूर, शहादा आणि गुजरात या परिसरात मोठ्या प्रमाणात केळी लागवड होते. जैन टिश्यूकल्चर केळी रोपांची उत्तम व्यवस्था केल्यास १० ते ११ महिन्यात बागा संपतात. म्हणजेच जुलैपर्यंत मृगबागांचा बहुतांश काढणी संपलेली असते. तर दुसरीकडे बाजारातून आंबा, द्राक्ष, संत्रा, पेरू, मोसंबी सुद्धा उपलब्ध नसतात. एकमेव फक्त केळी हेच फळ बागायत असते. आणि पुढे श्रावण महिन्यात गणपती,पोळा, श्रीकृष्ण जन्माष्टमी असे अनेक धार्मिक सण असतात. त्यामुळे केळीची मागणी वाढते आणि पुरवठा मात्र कमी कमी होत जातो.



*अमोल गणेश पाटील, रा. केऱ्हाळा, ता.रावेर यांनी १५ सप्टेंबर २०१९ रोजी केलेल्या केळी लागवडीला आता मोठे घड पडले आहेत.*



ऑगस्ट सप्टेंबरमध्ये लागवड केली म्हणजे मे महिन्यात निसवा होतो. अति उष्णतेने केळीची गुणवत्ता खराब होते. वाधा चांगला मिळत नाही असे केळी उत्पादकांना वाटते. परंतु असे काही नाही. नवीन लागवडीची खरीपाची तयारी आणि कापणीच्या बागांचे व निर्यातीचे नियोजन म्हणून खरे तर या बागांकडे थोडे दुर्लक्ष होते आणि त्याचा परिणाम गुणवत्तेवर होतो. मे मध्ये निसवणी होणा-या बागांना नियमीत ठिबक सिंचनाने पाणी देणे बागेला पाण्याचा ताण न पडू देणे. बागेभोवती ताट्या किंवा शेडनेट लावणे, लागवड मल्चिंगवर करणे हे प्रभावी उपाय तर आहेतच परंतू उन्हाळ्यात जमिनीच्या पृष्ठभागावर क्षारांचे प्रमाण वाढते. विपरित परिणाम केळी बागेवर होतो. त्यासाठी उन्हाळ्यात निसवण होत असलेल्या बागेला नियमित नत्र, पालाश, फॉस्फोरिक ॲसीड किंवा १२६-१-०, कॅल्शियम नायट्रेट यांचे प्रमाणीत फर्टिगेशन सुरू ठेवावे. तर बागेवर कुठल्याही प्रकारच्या जैविक ताण पडत नाही. पर्यायाने बागेची निसवण चांगली होवून उत्तम गुणवत्ता व वजन मिळते. परंतु गेल्या आठ वर्षापासून अमोल गणेश पाटील के-हाळा, प्रशांत महाजन - तांदलवाडी, सुनिल शांताराम चौधरी नाचणखेडा हे केळी उत्पादक शेतकरी दरवर्षी ऑगस्ट सप्टेंबरमध्ये प्रत्येकी १०००० ते ५०००० टिश्यूकल्चर केळी रोपांची लागवड करतात. त्यांच्या बागा अतिशय उत्तम असतात आणि ते नेहमीच प्रिमियम दराने केळी विकतात. मागील वर्षी अरूणदादा पाटील माजी आमदार रावेर यांनी ५ सप्टेंबरला २५००० जैन टिशूकल्चर केळीची लागवड केली. २६ किलोची रास पडली आणि १६०० रू च्या भावाने केळी विकली. या ही वर्षी श्री रामदास त्रंबक पाटील निंबोल, श्री अरूण पाटील- धामोडी प्रत्येकी पंचवीस हजार जैन टिशू कल्चर केळी रोपे सप्टेंबरमध्ये लागवड करीत आहेत या लागवडीचा दुसरा फायदा म्हणजे बागा पावसाळ्यात कापणीला येतात, तापमान ३२ ते ३४ अंश असते. आर्द्रता ७० ते ७५ टक्के असते त्यामुळे झाडं पडणे, घड विस्कटणे किंवा अति उष्णतेमुळे बागेचे नुकसान यापासून केळीचा बचाव तर होतोच परंतु जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यामध्ये गुणवत्तेच्या, मालाचा तुटवडा असल्यामुळे चांगल्या केळीला विक्रीसाठी अडचण नसते. आज रोजी सुद्धा श्री विशाल अग्रवाल, श्री सुनील चौधरी, प्रेमानंद महाजन, प्रशांत महाजन यांच्याकडे केळी निर्यातीसाठी, पॅकींग करण्यासाठी केळीची खुप मोठी मागणी आहे परंतु निर्यातक्षम केळी उपलब्ध नाही. केळीची पुरवठा साखळी सांभाळण्यासाठी व बाजारातील मागणीनुसार पुरवठा करण्यासाठी आपणास केळी लागवडीच्या नियोजनात बदल करणे अपेक्षित आहे. त्यातून कोविड सारख्या दुस-या कुठल्याही संकटातून वाचण्यासाठी वर्षभर लागवडीचे नियोजन असणे फार गरजेचे आहे.

